# जनता सहकारी बँक लि.,सातारा.

मुख्य कार्यालय : १७९, भवानी पेठ,सातारा. ४१५००२

जावक क्र./प्र.मु.का.आ./कर्ज विभाग/ /२०२३–२४ दि. १२/०४/२०२३

प्रति,

विभागप्रमुख/शाखाधिकारी/शाखाइनचार्ज
सर्व शाखा/सर्व विभाग
जनता सहकारी बँक लि., सातारा.

विषय :- बँकेच्या कर्जावरील व्याजदराबाबत.

वरील विषयास अनुसरुन तुम्हास कळविण्यात येते की, मा. संचालक मंडळ सभा दिनांक १०/०४/२०२३ ठ.न. ३३ अन्वये दिनांक १७/०४/२०२३ पासून आपल्या बँकेतील **नवीन मंजुर होणाऱ्या कर्जासाठी** खालील प्रमाणे व्याजदर आकारण्यास मंजुरी देण्यात आली असुन त्या पैकी फक्त सामान्य कर्ज तारणी (रिबेट दर्शविलेल्या) कर्जांनाच फक्त मा.सं.मं.सभा दि. ३१/०३/२०२२ अन्वये मंजुरी दिलेल्या रिबेट योजनेप्रमाणे रिबेट २% ऐवजी फक्त १% राहिल मात्र यापूर्वी म्हणजेच दि. ०१/०४/२०२२ पासून मंजुर होवून वितरीत झालेल्या कर्जखात्यांना पूर्वलक्षी प्रभावाने २% रिबेट लागू राहिल यांची नोंद घ्यावी.

| अ.नं. | कर्जाचा प्रकार | व्याजदर |
|---|---|---|
| १. | सामान्य कर्ज बिगरतारणी | १५.००% |
| २. | सामान्य कर्ज तारणी (१%रिबेट लागू) | १२.००% |
| ३. | घर बांधणी/फ्लॅट खरेदी/घर खरेदी (१%रिबेट लागू) | ११.००% |
| | घर दुरुस्ती (१%रिबेट लागू) (रु. ५ लाखापर्यत) | १३.००% |
| ४. | सामान्य कर्ज वाहन तारण | |
| | अ) चारचाकी व चारचाकीवरील नवीन वाहन (व्यवसायीक) | |
| | i) ऑन रोड किंमतीच्या ७५% पर्यत | १२.००% |
| | ii) ऑन रोड किंमतीच्या ७६% ते ९०% पर्यत | १३.००% |
| | iii) जूने वाहन ५ वर्षापर्यंत | १४.००% |
| | ब) चारचाकी नवीन वाहन (वैयक्तिक वापर) | |
| | i) ऑन रोड किंमतीच्या ७५% पर्यत | ९.५०% |
| | ii) ऑन रोड किंमतीच्या ७६% ते ९०% पर्यत | १०.५०% |
| | iii) जूने वाहन ५ वर्षापर्यंत | १२.००% |
| | क) दोन चाकी वाहन i) नवीन | ११.००% |
| | ii) जूने ३ वर्षापर्यंत | १३.००% |
| ५. | शैक्षणिक कर्ज ( तारणी ) | १२.००% |
| ६. | कॅश क्रेडीट बिगरतारणी | १५.००% |
| ७. | सोनेतारण कर्ज (प्रोसेसिंग फी लागू नाही.) | १०% |
| ८. | मुदत ठेव तारण कर्ज (पावतीच्या व्याजदरापेक्षा) | १.००% जादा |
| ९. | राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र/ किसान विकास पत्र/ विमा पॉलीसी तारण | ११.००% |
| १०. | बिल्डर्स लोन /प्रोजेक्ट लोन | १४.००% |

| | | |
|---|---|---|
| ११ | कॅश क्रेडीट तारणी माल नजर गहाण | |
| | अ) रु. २५,००,०००/— पर्यत | १२.००% |
| | ब) रु. २५,००,००१/— चे पासुन रु.४९,९९,९९९/— पर्यंत | ११.५०% |
| | क) रु. ५०,००,०००/— व त्याचे वरती कर्ज रक्कमेस | ११.००% |
| | क) वेअर हाऊस रिसिट तारण कर्ज | |
| | I) ५०,००,०००/— पर्यत | १२.००% |
| | ii) रु. ५०,००,००१/— वरील | ११.००% |
| | टिप : वरील प्रमाणे कॅश क्रेडीट व वेअर हाऊस रिसीट तारण नवीन कर्ज प्रकरण करीत असताना खालील अटी लागु होतील.<br>१) प्रोसेसींग फी मंजुर कर्ज रक्कमेच्या २%+ जी.एस.टी. प्रचलीत दरानुसार आकारण्यात येईल.<br>२) दर वर्षी नुतनीकरण करतेवेळी प्रोसंसींग फी १०००+ प्रचलित दरानुसार जी.एस.टी. आकारण्यात येईल.<br>३) वार्षीक उलाढाल कर्ज रक्कमेच्या ५ पट न झाल्यास पुढील नुतनीकरणाच्या वेळी मंजुर रकमेला पुढिल एक वर्ष मुदतीसाठी दसादशे १ % जादा व्याज आकारण्यात येईल.<br>४) सदर कर्ज प्रकरणाकरीता सहतारण म्हणून कर्जरकमेच्या प्रमाणात स्थावर मिळकत तारण द्यावी लागेल.<br>५) सदर कॅश क्रेडिट व वेअर हाऊस कर्ज योजना ही जुन्या कर्जांना लागू होणार नाही. अथवा सदर नवीन कर्ज व्याजदराचा लाभ घेता येणार नाही. तसेच नवीन कर्ज व्याजदराचा लाभ घ्यावयाचा असेल तर जुने कर्ज खाते पूर्णपणे बंद करुन नवीन कर्ज प्रकरणाकरीता स्थावर मिळकतीचे नव्याने रजिस्टर गहाण खत करुन लागणाऱ्या सर्व कागदपत्रासह कर्ज अर्ज दाखल करावा लागेल.<br>६) दि. ११/११/२०२२नंतर नवीन मंजुर होणाऱ्या सामान्य कर्जासाठी आवश्यक, मा. संचालक मंडळ सभा दि. ३१/०३/२०२२ अन्वये मंजुर केलेल्या रिबेट योजनेप्रमाणे रिबेट २% ऐवजी फक्त १% राहिल व योजनेतील उर्वरित सर्व नियम व अटी लागू राहतील.<br>७)दि.११/११/२०२२ पुर्वी मंजुर झालेली सर्व प्रकारची सामान्य कर्ज व कॅश क्रेडिट कर्जदारांनी आर्थीक वर्षात नियमितपणे कर्ज हप्ता भरला अथवा कॅश क्रेडिट खात्याचे व्याज दरमहा नियमितपणे भरल्यास सदर कर्जदारांना व्याजदरात सुट (रिबेट) देणेबाबतचा अधिकार मा.संचालक मंडळास राहिल. मात्र बँकेच्या ऑडिटेड ताळेबंदामध्ये बँकेस तोटा झालेला असेल अशा वेळेस योजनेप्रमाणे कर्ज खात्यांना व्याजामध्ये (रिबेट) सवलत देता येणार नाही. | |

मुख्य कार्यकारी अधिकारी

व्यवस्थापक

कर्ज, कर्ज मार्केटिंग व शेअर्स विभाग

प्रत माहितीसाठी

१)प्रशासन फाईल २)सर्व विभाग ३) सर्व शाखा फाईल